**नियमित दिवाणी दावा क्र.१०९/२०२०**
आश्रुजी तुकाराम हाळनवर व इतर विरुध्द
दत्तात्रय वेताळा हुलगे व इतर
सीएनआरक्र.एमएचएएच२२०००६९४२०२०

**आदेश निशाणी क्र.२२ खालील**
(पारित दिनांक ०८.०१.२०२१)

वादींनी प्रस्तुत दावा निरंतर मनाईसाठी दाखल केला असून प्रतिवादी क्र.२, ५ व ११ यांच्या नावात चूका झाल्याने त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

२) वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२, ५ व ११ यांची नावे टंकलिखीत करतांना चुकीची झाली असून त्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.२ चे नाव आशिष दत्तात्रय हुलगे असून दाव्यात ते नजर चुकीने दादा दत्तात्रय हुलगे असे झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे नाव आशिष अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. प्रतिवादी क्र.५ चे नाव सुरेश असून दाव्यात ते सुरेखा असे नमूद झाले आहे. तर प्रतिवादी क्र.११ चे नाव राणी दादा हुलगे असे नमूद कले आहे. तथापि, तिचे नाव पुजा असून पतीचे नाव आशिष आहे. त्यामुळे तिचे नाव पुजा आशिष हुलगे अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

३) प्रतिवादी क्र.१, ३ ते १० यांनी अर्जास म्हणणे सादर करुन वादींनी दावा दाखल करतांना आवश्यक काळजी घेतली नाही. अर्जातील कथन चुकीचे व काल्पनीक असून अर्ज खर्चासह नामंजूर करावा असा आक्षेप घेतला आहे.

४) वादींतर्फे विधीज्ञ श्री.चव्हाण व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.गुंजाळ यांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रस्तुत अर्जाचे चौकशी कामी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावर कारणांसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्यास उपयुक्त व आवश्यक आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करिता –**

६) प्रस्तुत दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला असून प्रतिवादी क्र.२, ५ व ११ यांच्या नावात हस्तदोषाने झालेल्या चूका दुरुस्त करण्याची परवानगी मागितली आहे. प्रतिवादी क्र.२ चे नाव आशिष आहे. तथापि, दाव्यात ते दादा असे नमूद केले आहे. तर प्रतिवादी क्र.५ चे नाव सुरेश असून दाव्यात सुरेखा असे नमूद केले आहे. प्रतिवादी क्र.११ ही प्रतिवादी क्र.२ ची पत्नी आहे. तथापि, तिचे नाव राणी दादा हुलगे असे नमूद केले आहे. तिचे नाव पुजा असून पतीचे नाव आशिष आहे.

७) प्रतिवादींनी अर्जास म्हणणे देतांना सदर नावे वादीला पूर्वीपासूनच माहीत होती असे कथन केले आहे. वादीं, प्रतिवादीं हे एकमेकांचे नातेवाईक नाहीत. त्यामुळे वादींना सर्वांच्या नावाची पूर्ण माहिती असणे शक्य नाही. वादींनी चुकीची माहिती झाल्यावर तात्काळ प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत दुरुस्तीने दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट न्यायालयास न्यायदानास मदत होणार आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर केला.

२. वादींनी विनंती प्रमाणे १४ दिवसांत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत पटलावर दाखल करावी.

Dhanaji Jayasing Patil
Digitally signed by Dhanaji Jayasing Patil
Date: 2021.01.08 16:28:23 +0530

दिनांक ०८.०१.२०२१ ( डि.जे. पाटील )

कर्जत दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कर्जत.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Ganesh Sudhakar Mancharkar |
| Name of Court | : | Shri.D.J. Patil Saheb,<br>Judicial Magistrate First Class, Karjat, Tal.Karjat, Dist.Ahmednagar. |
| Order date | : | 08.01.2021 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 08.01.2021 |
| Order digitally signed by the Presiding Officer on | : | 08.01.2021 |
| Order uploaded on | : | 08.01.2021 |